# ग्रामपंचायत कार्यालय बहिरोबावाडी

## ता. कर्जत जि. अहिल्यानगर

**ई-कोटेशन निविदा सूचना क्र. ०१ / २०२५-२६ (प्रथम वेळ)**

सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **बहिरोबावाडी**, तालुका **कर्जत,** जिल्हा **अहिल्यानगर** येथे **शासकीय लेखा संकेतांक क्र. २२०२ जे ८१३ डीपीडीसी, शाळा खोल्या नवीन बांधकाम** या योजने अंतर्गत खालील कामा करिता साहित्य पुरवठा करणे साठी २ लिफाफा पद्धतीने मान्यता प्राप्त पुरवठाधारक /ठेकेदार /उत्पादक यांचे कडून online पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा महाराष्ट्र शासनाच्या या https:// mahatenders.gov.in संकेतस्थळावरून खरेदी व दाखल करता येतील. निविदा संबंधित ची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

| अ नं | कामाचे नाव | आवश्यक वस्तूचे नाव | पात्रता | निविदा विक्री रक्कम | बयाना रक्कम | साहित्य पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे जोगेश्वरवाडी येथे एक शाळा खोली नवीन बांधकाम करणे, ता. कर्जत या कामासाठी साहित्य पुरवठा करणे. | १. सिमेंट.<br>२. स्टील.<br>३. खडी २० mm.<br>४. क्रश सॅण्ड.<br>५. वीट.<br>६. फरशी.<br>७. मजुरी. | अधिकृत मान्यता प्राप्त पुरवठाधारक / उत्पादक / सप्लायर्स. | २३६/- | Nil | ३१ मार्च २०२७ अथवा आर्थिक वर्ष संपेपर्यंत. |

| | |
|---|---|
| ई निविदा प्रसिध्दी कालावधी | As Per Online Schedule. |
| ई निविदा अधिग्रहित कालावधी | |
| ई निविदा ऑनलाईन सादर करण्याचा कालावधी | |
| ई निविदा उघडण्याचा कालावधी | |

**- <u>निविदेच्या अटी व शर्ती</u> –**

**१.** निविदा फी व बयाणा रक्कम हि ई-निविदा धारकाने इंटरनेट बँकिंग द्वारे या संकेतस्थळावर ऑनलाइन भरणे आवश्यक आहे. वरील साहित्य दर हे जीएसटी व इतर करासह देण्यात यावेत.

**२.** पुरविण्यात येणा-या सर्व साहित्याची विक्रीकर ,आयकर व शासनाने इतर उपकार व फी भरण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.व त्यातील कोणत्याही नियमाचा भंग झाल्यास दंड व शिक्षेस

पुरवठा धारक स्वतः जबाबदार राहील. त्यामुळे BOQ मध्ये साहित्याचे दर सर्व करासहित विचार करून नोंदवावे.

३. मंजूर निवेदेतील साहित्याचे दर निविदा मंजूर दिनांकापासून **३१ मार्च २०२६ किंवा आर्थिक वर्ष संपेपर्यंत** लागू राहतील. बाजारपेठेत सदर साहित्याचे दर वाढल्यास वाढीव दराची रक्कम ग्रामपंचायत देणार नाही.

४. निविदा मंजूर झालेल्या पुरवठा धारकास आदेश पत्र देण्यापूर्वी **रुपये १००/- चा स्टॅम्प पेपरवर** विहित नमुन्यात करारनामा करून देणे बंधनकारक राहील. करारनामा करतेवेळी निविदा नोटीस मधील अटीचा त्यात समावेश असेल याशिवाय इतरही अटीचा समावेश करण्यात येईल.

५. पुरवठा धारकाने पुरविलेल्या साहित्याची देयके निधीचे उपलब्धतेनुसार अदा करण्यात येतील.मात्र त्याकरिता कोणत्याही प्रकारचे अग्रीम दिले जाणार नाही. कामाचे पुरवठा आदेश दिल्यानंतर तात्काळ मालपुरवठा करून, साहित्याची खात्री झाल्यानंतर रक्कम उपलब्ध अनुदाना नुसार धनादेशाने अदा केली जाईल.

६. एकच अथवा सर्व निविदा कोणतेही कारणे न देता अंशता संपूर्ण नाकारण्याचा अधिकार **सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बहिरोबावाडी** यांनी राखून ठेवला आहे. त्याप्रमाणे निविदा का नाकारली याचा खुलासा देखील मागता येणार नाही.

७. निविदेला मंजुरी मिळालेनंतर साहित्याचा पुरवठा, पुरवठाआदेश मिळाल्या वर सात दिवसाचे कालावधीत स्वखर्चाने केला पाहिजे. ग्रामपंचायत कार्यालयाचे प्रतिनिधी साहित्याची नमुना साहित्य प्रमाणे तपासणी करतील व त्यावेळी पुरवठादाराने निकृष्ट प्रतीचा साहित्याचा पुरवठा केला असेल तर ते साहित्य ग्रामपंचायत स्वीकारणार नाही व यामध्ये पुरवठा धारकाचे नुकसान झाल्यास ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही. यानंतर साहित्य खरेदी नवीन निविदा प्रसिद्ध केली जाईल. मुदतीत साहित्य पुरवठा न केल्यास प्रतिदिन **रुपये १००** दंडाची आकारणी केली जाईल. विलंबाने साहित्य पुरवठा केल्यास दंडाची रक्कम बिलातून वजा केली जाईल.

८. ज्याची निविदा मंजूर होणार नाही त्याची इसारा /अनामत रक्कम ग्रामपंचायतीकडे मागणी करण्याची गरज नाही. कारण सदर रक्कम ऑनलाईन पद्धतीने संबंधिताच्या बँक खात्यावर जमा होईल.

९. निविदेबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत **ग्रामपंचायत बहिरोबावाडी** जो निर्णय घेईल, तो निर्णय निविदाधारकास बंधनकारक राहील. त्या निर्णयाविरुद्ध निविदा धारकास कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

१०. सशर्त निविदा स्वीकारली जाणार नाही.

११. सदर निविदेमध्ये निविदा रक्कम ही पुरवठा दाराचा रकमेवर अवलंबून असल्याने ,सदर निविदा रक्कम ०० दर्शविण्यात येत आहे.

१२. निविदांमध्ये वर नमूद केलेल्या साहित्यासाठी दर्शविलेली तरतूद ही अंदाजीत आहे. प्रत्यक्ष तरतूद असली तरी उपलब्ध अनुदानानुसारच/कामानुसारच खरेदी केली जाईल.

१३. प्रशासकीय  व अन्य कारणास्तव देयकाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास, त्याबाबत व्याजाची मागणी करता येणार नाही. किंवा न्यायालयात याबाबत पुरवठाधारकास दाद मागता येणार नाही.

१४. ई निविदा सादर करताना वैधानिक लिफाफा तील कागदपत्र अपलोड करण्यापूर्वी स्वत: कागदपत्रावर पान क्र. /एकूण पाने ( उदा.१/६७) देण्यात यावेत.पान क्रमांक पुष्ठांकित करून PDF फाईल लिफाफा क्र.1 मध्ये अपलोड करावी.अपलोड करण्यात येणाया कागदपत्रावर पृष्ठ क्रमांक नसल्यास सदरची निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**१५. कंत्राटदाराने ई निविदा सादर करताना करताना वैधानिक लीफाफ्यातील कागदपत्रे अपलोड करण्यापूर्वी सर्व कागदपत्रांवर डीजीटल स्वाक्षरी, पान क्र. व एकुण पान क्र. खाली दिलेल्या पद्धतीने सर्व पानावर पान क्र. टाकून पृष्ठांकित करून पीडीएफ फाईल लिफाफा क्र. १ मध्ये अपलोड करावी, अपलोड करण्यात येणाऱ्या कागदपत्रांवर पृष्ठ क्रमांक नमुद नसल्यास सदर निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.**

| डिजिटल स्वाक्षरी | पान क्रमांक | एकुण पान क्रमांक |
|---|---|---|
| | | |

१६. मागणी केलेली कागदपत्रे पूर्णपणे अपलोड केलेली नसल्यास निविदा नाकारण्यात येईल.

## <u>लिफाफा क्र. १ मध्ये जोडणेची कागदपत्रे</u>

१. ऑनलाईन पध्दतीने निविदा फी व बयाणा रक्कम भरलेली पावती.
२. पुरवठा धारकाचे उद्यम किंवा उद्योग आधार किंवा शॉप ऍक्ट किंवा ठेकेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र.
३. निविदाधारकाचे पॅनकार्ड.
४. आयकर भरलेले विवरणपत्र किमान तीन वर्षाचे.
५. जीएसटी रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट.
६. पुरवठादार हा अधिकृत उत्पादक किंवा पुरवठाधारक किवा सप्लायर्स किंवा ठेकेदार  असल्याचे प्रमाणपत्र.

## <u>लिफाफा क्र. २ मध्ये जोडण्याची कागदपत्रे</u>

१. BOQ फाईलमध्ये दर नोंदवून ती अपलोड करावी.
२. सर्व प्रकारचे कर, पोच वाहतूक इ.सह  याचा विचार करून दर नमूद करावेत.

ग्रामपंचायत अधिकारी

सरपंच

Signature Not Verified
Digitally signed by KOMAL SHARAD YADAV
Date: 2026.05.20 10:25:08 IST
Location: Maharashtra-MH